लोकमत
मुंबई, मंगळवार,
२२ मार्च २०११

## महत्त्वाचे



चीनच्या विकासासंबंधी विषयावर आयोजित करण्यात आलेल्या जगभरातील उद्योजकांच्या परिसंवादात उपस्थित असलेले चीनचे पंतप्रधान वेन जियाबाओ.

## कायद्याचा फेरआढावा

नवी दिल्ली – कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिनियमांचा फेरआढावा घेण्याबाबत आंतरमंत्रालय समूह विचार करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले. आंतरमंत्रालय समूह वस्तूंचे विपणन विशेषत: कृषी आणि खाद्यवस्तूंच्या उत्पादनांवर विशेष लक्ष देईल.

## व्होल्टासचा करार

मुंबई– व्होल्टासने किऑन समूहाशी सामंजस्य करार केला आहे. फोर्कफिट ट्रक आणि गोदामाच्या उपकरणांच्या क्षेत्रात हा करार करण्यात आला आहे. नव्या कंपनीचे नाव व्होल्टास मटेरियल्स हँडलिंग असे असणार असून पुढील महिन्यापासून ती कार्यरत होईल.



## साखर निर्यातीला

### भावात वाढ

| | |
|---|---|
| जिंदाल स्टील | १२.६५ |
| महिंद्रा अँड महिंद्रा | ८.८० |
| एचडीएफसी | ५.७० |
| टाटा स्टील | ५.२० |

### भावात घट

| | |
|---|---|
| हिरो होंडा | ४०.४० |
| मारुती सुझुकी | २६.९५ |
| इन्फोसिस | १९.४० |
| टीसीएस | १०.४५ |

बीएसई १७,८३९.०५ ↓ ३९.७६ एनएसई ५,३५४.७५ ↓ ८.९५ सोने १० ग्रॅम २१,०५

# करदात्यांचे पैसे ल

नवी दिल्ली, दि.२१ (वृत्तसंस्था)– देशभरातील १५ लाख आयकरदात्यांचे पैसे लवकरात लवकर परत करा असा आदेश केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने आयकर विभागाला दिला आहे. करदात्यांकडून जमा केलेला अतिरिक्त कर परत करण्यास अपयश आल्यास प्राप्तीकर खात्याचे मुख्य आयुक्त आणि आयुक्त हे त्यांच्या कामात अयशस्वी ठरले असे मानले जाईल, असा इशाराच केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष सुधीर चंद्र यांनी दिला आहे.

आयकर खात्याच्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुधीर चंद्र यांनी या आशयाची पत्रे लिहिली आहेत. आयकराचा परतावा परत करण्याचा वेग अपेक्षेपेक्षा कमी आहे. २०१०-११ या आर्थिक वर्षात हा प्रश्न किती प्रभावीपणाने हाताळला जातो यावरून प्राप्तीकर खात्याचे मुख्य आयुक्त आणि आयुक्तांच्या



मुंबई

ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष विजय कलंत्री यांना नुकतेच आयात-नर्यात व्यापारात अतुलनीय कार्य केल्याबद्दल केंद्रीय उत्पादन व आयात शुल्क मंडळाचे अध्यक्ष एस.दत्त मजुमदार यांच्या हस्ते गौरवण्यात आले. ऑल इंडिया लिक्विड बल्क इम्पोर्टर्स अँड एक्पोर्टर्स असोसिएशनतर्फे मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात संघटनेचे अध्यक्ष जयंत लापसिया देखील उपस्थित होते.